**स.के.नं.५८२/२०२४**
**नि. क्र. १० लगत**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी
माझे नाव –प्रकाश बळीराम शिंदे
वय वर्षे –५९ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त
राहणार – चिपळूण, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी.
मी सत्य प्रतिज्ञेवर असे कथन करतो की,

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीम.एम.ए.दावत यांचेमार्फत सुरु.</u>**

जून २०२४ मध्ये मी पो.उ.नि. या पदावर अलोरे शिरगाव पोलीस स्टेशन अंतर्गत खडपोली दुरक्षेत्र येथे नेमणुकीस होतो. अपघात मृत्यु रजिस्टर क्र.९/२०२४ चा तपास दि.१७.०५.२०२४ रोजी माझ्याकडे देण्यात आला होता. अपघात मृत्यु रजिस्टर माझ्याकडे आल्यानंतर मी त्याची पाहणी केली असता सुर्वे नावाचा इसम अपघातामध्ये मयत झाला होता. कृष्णा ॲन्टीऑक्सीडंट खडपोली एम.आय.डी.सी येथील युनिट क्र.३ मध्ये दि.१३.०५.२०२४ रोजी दुपारी १३.०० वा. सुमारास अपघात घडला होता.

२. अपघातामध्ये संतोष यशवंत सुर्वे हा मयत झाला. त्याच्या अंगावर हाय बॉयलर फिनॉल प्लस झायलिन हे केमिकल पडल्यामुळे तो भाजून गंभीर जखमी होवून मयत झाला. मयत संतोष यंशवंत सुर्वे चार कामगारांसह ट्रक मध्ये सदर केमिकल भरत असताना त्यातील एक बॅरले फूटून त्यातील केमिकल त्याच्या अंगावर पडले. त्यामुळे त्याला प्राथमिक उपचारासाठी अपरांत हॉस्पीटल चिपळूण येथे दाखल करण्यात आले. त्याला पुढील उपचाराकारीता नॅशलन बर्न हॉस्पीटल, एरोली नवी मुंबई येथे दाखल केले. तेथे उपचार चालू असताना दि.१५.०४.२०२४ रोजी तो मयत झाला.

३. दि.१४.०५.२०२४ रोजी घटनास्थळाचा मी पंचनामा केला. घटनास्थळी फूटलेले केमिकलेचे बॅरेल दिसून आले. घटनास्थळ सुपरवायजर दिनेश मारूती ढोकरे यांनी दाखवले. केमिकलचे बॅरेल फूटून घटनास्थळी केमिकल पडल्यामुळे तेथील सुपरवायजरने केमिकलवर राख व वाळू टाकली होती. त्यातील काही राख व वाळूचे नमुने रासायनिक तपासासाठी जप्त केले. घटनास्थळी कामगाराच्या अंगावरील कपडे, शुज,

हॅन्डग्लोज इ. वॉशरुमच्या कठडयावर दिसून आले. त्या कपडयावर देखील केमिकलचे डाग दिसून येत होते. ते डाग हाय बॉयलर फिनॉल प्लस झायलिनचे असल्याचे ढोकरे यांनी संगितले.

४. घटनेबाबत प्रोडक्शन मॅनेजर विनायक सुतार यांचेकडे चौकशी केली. चौकशीदरम्यान त्यांनी सांगितले की, सदर बॅरेल वाहनामध्ये सुरीक्षत भरण्याचे काम प्रोडक्शन सुपरवायजर आरोपी क्र.१ अमोल संजय गणवे यांचे आहे. मयत सुर्वे व इतर कामगारांनी झायलिन हायबॉयलर फिनॉल प्लस चे एक बॅरेल गॅसने फुगलेला असल्याचे प्रोडक्शन सुपरसाजर यांच्या निदर्शानास आणून दिले होते. त्या बॅरेल मधील गॅस रिलीज करण्याचे काम आरोपी क्र.१ चे होते. परंतु त्यांनी तो रिलीज न केल्याने सदरचा अपघात घडला. घटनास्थळाची पाहणी आरोग्य उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा, रत्नागिरी यांनी केली होती. मी चौकशीदरम्यान त्यांच्याकडून अभिप्राय घेतले.

५. त्यांच्या अहवालामध्ये भोगवटदार आरोपी क्र.२ अशोक कुमार पाटील यांनी कामगारांना योग्य ते केमिकल हाताळण्याचे प्रशिक्षण न देता वयक्तीक सुरक्षा साधणे पुरवली नाहीत. अशा त्रुटी नमुद आहेत. मी साक्षीदारांची तपास टिपणे नोंदविली. चौकशीदरम्यान आरोपी क्र.१ ने कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याचे निदर्शनास आले. आरोपी क्र.२ ने देखील योग्य ती काळजी न घेतल्यामुळे मी सदरची फिर्याद दि.२८.०६.२०२४ रोजी नोंदविली. आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. आज रोजी आरोपी हजर आहेत. आता मला दि.२८.०६.२०२४ रोजीचा माझा **जबाब** दाखवण्यात आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.१२** देण्यात येते.

सरतपास पुर्ण

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. सुधीर.एस.बुटाला यांचे तर्फे सुरु**

६. माझे शिक्षण १२ वी पास आहे. हे म्हणणे खरे आहे की, रासायनिक विषायासी माझा संबंध नाही त्यामुळे रसायन विषयाचे ज्ञान नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे अपघातातील रसायन कशासाठी वापरतात व कसे हाताळतात याचे मला ज्ञान नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्याद नि.१२ मी दुस–याच्या माहितीवर आधारुन

दाखल केली आहे.

७. सदर कंपनीत घटनेच्या वेळी किती युनिट कार्यरत होते हे मला सांगता येणार नाही. तसेच कंपनीत एकूण कामगार किती याची मी माहिती घेतली नाही. प्रत्येक युनिटचे इंचार्ज कोण व त्यांचे कामाचे स्वरुप काय याची मी माहिती घेतली. साक्षीदार स्वत: सांगातात की मला प्रत्येक युनिट बाबत सांगता येणार नाही. प्रत्येक युनिटचा एक प्रोडक्शन मॅनेजर असतो हे मला माहित आहे. प्रत्येक प्रोडक्शन मॅनेजरच्या हाताखाली अनेक सुपरवायजर असतात. युनिट क्र.१ व २ मध्ये किती सुपरसायजर होते हे मला सांगता येणार नाही. युनिट क्र.३ मध्ये कथीत घटनेवेळी किती सुपरवाजर होते ते मला सांगता येणार नाही.

८. आरोपी क्र.२ यांच्या कंपनीमध्ये कामगारांना रसायन हाताळण्याबाबत शिक्षण दिले जाते किंवा नाही याची मी पाहणी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यावेळी निळया रंगाचे ड्रेस, बुट, हेम्लेट, हॅण्डग्लोज व सेफ्टी गॉगल मिळून आले. हे म्हणणे खरे आहे की, कंपनीमध्ये निळया रंगाचे ड्रेस सर्व कामगारांकडे होते. हे म्हणणे खरे आहे की, निळया रंगाचे ड्रेस पुर्ण शरीर झाकणारे होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या चौकशीदरम्यान संबंधीत कामगारांनी निळया रंगाचा ड्रेस पुर्ण शरीर झाकणारा घातला होता असे निदर्शनास आले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या चौकशीदम्यान संबंधी कामारांनी बुट, हेल्मेट, हॅण्डग्लोज व सेफ्टी गॉगल घातल्याचे निदर्शनास आले.

९. मी चौकशीदरम्यान संबंधीत कामगारांना रसायन हाताळण्याचे प्रशिक्षण झाले आहे किंवा कसे हे विचारले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात नमुद करतो त्याप्रमाणे दोन्ही आरोपींचा कथीत घटनेशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात नमुद करतो त्याप्रमाणे दि.१३.०५.२०२४ रोजी कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, बॅरेल गॅसने फुगलेला अशी माझी ऐकीव माहीती आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती माहीती मी खोटी सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, बॅरेल मधील गॅस रिलीज करण्याची जबाबदारी आरोपी क्र.१ यांची होती व त्यांना त्याबाबत प्रोडक्शन सुपरवायजर ढोकरे यांनी सांगितले असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही

की, आरोपी क्र.२ बाबत उपसंचालक सुरक्षा औद्योगिक, रत्नागिरी यांनी अहवाल दिल्याचे देखील मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ युनिट क्र.३ चे इंचार्ज होते असे मी खोट सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती.
सही/-
(वाय.सी. पाटील )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, व
न्यायादंडाधिकारी वर्ग-१,चिपळूण

दिनांक - १४/०८/२०२५
चिपळूण.

## - प्रमाणपत्र -

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ प्रतिप्रमाणे प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| **न्यायालयाचे नाव** | **सह दिवाणी न्यायालय क.स्तर, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी.** |
| न्यायनिर्णय घोषीत दिनांक | १४.०८.२०२५ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | १४.०८.२०२५ |
| न्यायनिर्णय अपलोड केलेले दिनांक | १४.०८.२०२५ |